दै. सामना

14 JUL 2017

# पीएमपीएलची वेबसाईट आणखी अद्ययावत

## पास, बस बुकिंगपासून पुणे दर्शनपर्यंत सर्व सुविधा ऑनलाइन

पुणे, दि. १३ (प्रतिनिधी) - पीएमपीएल प्रशासनाने प्रवाशांच्या सेवेत अद्ययावत वेबसाईट तयार केली आले. या वेबसाईटद्वारे बसचा पास, बस बुकिंगपासून पुणे दर्शनसारख्या सुविधांचा लाभ एका क्लिकवर घेता येणार आहे. त्याचप्रमाणे प्रशासनाने गेल्या काही महिन्यांपूर्वी तयार केलेल्या 'पीएमपी ई-कनेक्ट' हे ॲपही सुधारित करून अधिक प्रवासीकेंद्रीत करण्यात आले आहे.

पीएमपीएल प्रशासनाने pmpml.org ही अत्यंत सुटसुटीत वेबसाईट तयार केली असून, त्यात जर्नी प्लॅनर, रेग्युलर सर्व्हिस, नाईट सर्व्हिस, पुणे दर्शन, एअरपोर्ट सर्व्हिस, डॅशबोर्ट आणि सिटीझन कॉर्नर असे फिचर देण्यात आले आहेत. तसेच पुणे दर्शन बसचे सीट रिझर्व्ह करणे, एअरपोर्टला जाणाऱ्या बसची माहिती घेणे, एखाद्या कार्यक्रमासाठी संपूर्ण बस बुक करणे अशी कामे वेबसाइटचा वापर करून करता येणार आहे, असे पीएमपीएलचे अध्यक्ष तुकाराम मुंढे यांनी सांगितले.

दररोज किती ट्रीपचे नियोजन करण्यात आले होते, प्रत्यक्षात किती ट्रीप झाल्या, दिवसभरात किती पास विकले, दैनंदिन प्रवासी संख्या, मार्गावरील बसची संख्या तसेच किती तक्रारी दाखल झाल्या व किती सोडविल्या या सर्वांची माहिती दररोज अपडेट केली जाणार आहे. वेबसाईट प्रमाणे पीएमपीएलचे पीएमपी ई-कनेक्ट हे अप्लिकेशनदेखील अपडेट करण्यात आले आहे. आता हे ॲप सर्व आपरेटिंग सिस्टीमवर वापरता येणार आहे. तसेच वेबासाइटवर असलेले सर्व फिचर ॲपमध्ये उपलब्ध करण्यात आले आहेत.

### दोन महिन्यांत २०० मिनी बस

पीएमपीएलसाठी २०० मिनी बस खरेदी करण्यात आल्या आहे. यातील १२० बस पुणे महापालिकेतर्फे तर ८० बस पिंपरी-चिंचवड महापालिकातर्फे खरेदी करण्यात आल्या आहेत. या बस पुढील २ महिन्यांत रस्त्यांवर धावणार आहेत, अशी माहिती पीएमपीएलचे अध्यक्ष तुकाराम मुंढे यांनी दिली. दरम्यान, सध्या पुणे महानगर परिवहन महामंडळाचे दररोजचे उत्पन्न हे साधारण १ कोटी ७० लाख रुपये आहे. हे उत्पन्न २ कोटी रुपयांवर न्यायचे आहे. त्यासाठी ऑटो-रोस्टर तयार करण्यात आले आहे. याद्वारे तीन महिन्यांसाठी एक बस, एक वाहक, एक चालक आणि एक मार्ग असे ठरवून देण्यात आले आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.